REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 10 | JULY - 2021

# सावित्रीबाई फुले याचे जीवन व कार्य

नम्रता देवीदास ढाळे
संशोधक विद्यार्थिनी, इतिहास आधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रस्तावना:-




भारताच्या प्रथम महिला शिक्षिका नव्हे तर एक उत्तम कवयित्री, अध्यापिका, समाजसेवा आणि पहिल्या विद्याग्रहण करणारी महिला आहेत. या व्यतिरिक्त महिलांच्या मुक्तिदाता देखील म्हटल्या गेल्या. संपूर्ण आयुष्य महिलांच्या शिक्षित करण्याकरता आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्याकरिता खर्ची घातले. महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणताना अनेक संघर्ष मधून सामोरे जावे लागले. पण त्यानी हार न मानता खचून न जाता संपूर्ण आत्मविश्वासाने संघर्षाला सामोरे गेले आणि यश मिळवले शिक्षणाचे माहेरघर असे ज्याला आपण म्हणतो, त्या पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि ज्योतीरावांच्या मदतीने सतत पुढे जाण्याकरिता प्रेरणा मिळत होती. त्यांचे पती फक्त पती नव्हते, तर एक चांगले गुरु व संरक्षक होते. सावित्रीच्या कार्याचे ते सतत कौतुक करून त्यांना उत्साह वाढवत होते. समाजव्यवस्थेला प्रचंड विरोध करत. स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली. असंख्य महिला शिक्षण सध्या घेऊत आहेत. जुन्या परंपरा रूढी यांना त्यांनी फाटा देऊन स्त्री उद्धाराचे कार्य केले.

## सावित्रीबाईंचे पूर्वाआयुष्य:-

3 जानेवारी 18 31 रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील नायगाव येथे झाला. खंडोजी नेवसे पाटील त्यांचे वडील 1840 मध्ये वयाच्या 9 वर्षात, 13 वर्षीय मुलगा ज्योतिबा फुले यांच्याशी लग्न झाले. त्यावेळी त्या शिक्षित नव्हत्या. पण लग्नानंतर जोतिबांनी त्यांना लिहायला व वाचायला शिकवले. स्त्रियांच्या दृष्टिकोनातून तो काळ फारसा चांगला नव्हता. शिक्षण स्त्रियांनी घ्यावे त्याकाळचा समाज तयार नव्हता. जुन्या चालीरीतींचा पगडा आणि समाजाच्या भीतीने ज्योतीबांच्या घराच्यानी दोघांना घराबाहेर काढले. परंतु ज्योतीबांनी सावित्रीबाईंचे शिक्षण सुरू ठेवले. त्यांना प्रवेश एका प्राथमिक शाळेत घेतला. समाजाच्या इतक्या विरोधानंतर सावित्रीने आपले शिक्षण पूर्ण झाले पाहिजे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर शिक्षणाचा उपयोग

समाजातील महिलांना झाला पाहिजे असा एक ध्यास धरला. सावित्रीबाई आणि जोतीरावांची मावस बहीण सगुणा बाई या दोघींना शिक्षणाचे धडे ज्योतिबा शेतामध्ये शिकवले.

ज्योतिबानी "सावित्री, कोणी दिले पुस्तक ?मँडम बाईनी "लगेच सगुणा बाईंनी जोतीस उत्तर दिले. सगुणाबाई एका गोऱ्या इंग्रजी साहेबाकडे घरकाम करण्यास जात आसे. आसेच एकदा प्रेमाने या साहेबांच्या बायकोने रंगीबेरंगी चित्रे पाहण्यासाठी पुस्तक सगुणाबाईना दिले. सावित्रीबाई मोठ्या कुतुहलाने व आवडीने त्या पुस्तकातील चित्रे पाहिली होती. परंतु चित्रा मधुन त्यातील काहीच कळत नव्हते. युगानयुगे अज्ञानाच्या खाईत पडलेल्या स्त्री वर्गाची ही शिक्षणाअभावी अशीच दुरावस्था झालेली होती .या दुरावस्थेला छेद देण्याचे महान कार्य सावित्रीबाई कडून घडवून यावयाचे असल्याने ते पुस्तक जिज्ञासेपोटी सावित्रीने जपून ठेवले होते .सावित्री ज्योतीस म्हणाली या पुस्तकात छान छान रंगीबिरंगी चित्रे आहेत ती पाहिली मला ती चित्रे फार आवडली मला लिहिता वाचता येत नसल्याने या चित्रांचा अर्थ मला उमगला नाही .मला यातले काही कळले नाही .यातला अर्थ कळावा असे सारखे वाटते .माझ्यासारख्या अडाणी ला हे पुस्तक वाचून दाखवणार ?कोण मला यातला अर्थ समजून सांगणार ?शेवटी तुम्ही हे पुस्तक मला वाचून दाखवाल, म्हणून नाविलाजाने मी हे पुस्तक तुमच्याकडे आणले आहे .मानवतेच्या इतिहासातील एका भारतीय स्त्रीने ज्ञानाच्या मोठ्या जिज्ञासू वृत्तीने असा प्रश्न निर्माण करून सावित्रीने भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांनी ज्ञानी करावा याचे आव्हान करून नव्या युगाला प्रारंभ केला होता .याच प्रश्नातून ज्योतिस स्त्रीमुक्ती ची प्रेरणा मिळाली होती . सावित्रीच्या या प्रश्नाचे ज्योतिष फार आनंद झाला तो सावित्रीस म्हणाल," सावित्री मला भिण्याचे कारण नाही .आज तू फार चांगले काम केलेस .आज तू मला ज्ञानाचा मार्ग ,शिक्षणाचा मार्ग घडवण्याचा दिशा दाखविला .तू मला खरी प्रेरणा दिली .आज पासून मी तुला लिहायला ,वाचायला शिकवणार आज खऱ्या अर्थाने माझ्या मनातलं बोललीस तू"

भारतीय स्त्रियांच्या ज्ञानाच्या नव्या युगात आणण्याचे प्रयत्न त्या आंब्याच्या झाडा खाली झाले .व खऱ्या अर्थाने या सर्वांची प्रेरणा होती .सावित्री ते आंब्याचे झाड जणू काय शाळेची इमारत ,आंब्या खालची माती ही पार्टी व झाडाच्या फांदी वाळलेली काडी ही लेखणी .ज्योतीने याकाळात मातीवर आपल्या हातातील काडीने सावित्री व सगुणा यांच्या साथीने पहिले अक्षर काढले' अ 'पहिला शब्द काढला' आई' 'हे अक्षर सावित्री शिकवून खऱ्या अर्थाने भारतीय स्त्री सावित्री' ज्ञानाई 'करून स्त्री शिक्षणाचा शुभारंभ जनाई च्या मळ्यात अठराशे १८४१ ला झाले.

## पहिली भारतीय ट्रेड शिक्षिका-:

सावित्री व सगुणाबाई या दोघीही जन्मता बुद्धिमान असल्याने व शिक्षणाची आवड असल्याने दोघीही शिक्षणात चांगली प्रगती केली .त्याकाळी पुण्यात मिसेस मिचेल बाई ह्या इंग्लिश महिला नॉर्मल स्कूल चालवीत होत्या .या शाळेचा नावलौकिक सर्व पुणे शहरात पसरला होता .नॉर्मल स्कूल प्रमुख मिचेलबाई यांनी सावित्रीबाईची परीक्षा घेऊन त्यांनी तिला नॉर्मल स्कूलमध्ये तिसऱ्या इयत्तेसाठी प्रवेश दिला .या संस्थेत त्यांनी सावित्री व सगुणाबाई यांना उत्तम शिक्षण देऊन आदर्श ध्येयवादी शिक्षिका बनवले होते .सावित्री ही जिद्दी स्वभावाची ध्येयवादी मेहनती व प्रयत्नवादी होती .त्यांनी मन लावून अभ्यास करून १८४७ ला त्या नॉर्मल स्कूल मधून चौथ्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या .सावित्री ही देशातील पहिली भारतीय ट्रेड शिक्षिका होती .त्याच्यानंतर सगुणाबाई ट्रेड शिक्षिका बनल्या.

## परांजपे यांच्या लग्नात ज्योती रावांचा अपमान सावित्री झाली ज्योतिरावांचे प्रेरणाशक्ती -:

१८४७ परांजपे यांचे लग्नात ज्योतीरावांचा अपमान सावित्री झाली जोतीरावांची प्रेरणाशक्ती सावित्री मोठ्या शांतचित्ताने ज्योतिष म्हणाली' ,तुम्ही शिकलात वाचन केले .ज्ञानी बनलात विचार करण्याची शक्ती तुम्हास शिक्षणामुळे मिळाली .वाचनाने मान-अपमान याची समज तुम्हाला झाली .तुम्हाला अपमान तरी समजला बाकीचे तर रोज जनावरासारखे मुकाट्याने खालच्या जातीचे समजून हवमान सहन करीत आहेत . जनावर अपेक्षाही हलाखीचे जीवन जगत आहेत .त्या लोकांनी स्वतःचा अपमान समजण्याइतके शहाणे कोण करणार ,त्यांचा स्वाभिमान कोण जपणार ,माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे .अशी जाणीव त्यांच्यात कोण करून देणार ,ते अधिकार गाजविण्याचा अधिकार कोण करणार 'असे प्रश्न सावित्रीने ज्योतिष परखडपणे केले .ज्योती मोठ्या आश्चर्याने सावित्री कडे पाहू लागला व तो म्हनाले' ,सावित्री खरं बोललीस एक सत्य तू मला उलगडून दाखविले 'त्यावर सावित्री निरागस पणे ज्योतिष म्हणाली ' ,तुम्ही मला जर शिकून शहाणं केलं तसेच सर्वांना शिकून शहाणे करा.' त्यावर ज्योती म्हणाले ' ,सावित्री अगदी खरं बोललीस तू सावित्री आज मला खरा सत्याचा मार्ग दाखविला तू हा माणुसकीचा फार मोठा महामंत्र दिलास तू असं मला समाजपरिवर्तनाची खरी प्रेरणा तू आज मला दिलीस.'

## शाळेची सुरुवात व पहिली शिक्षिका-:

ज्योतीने पहिल्या प्रथम आपल्या मनातील मुलीची शाळा सुरू करण्याचा विचार सावित्रीस दिला १ जानेवारी १८४८ पुणे येथील बुधवार पेठेच्या भिडे यांच्या वाड्यात पहिले पाऊल मोठ्या निर्धाराने टाकले. स्त्रियांच्या शिक्षणाच्या या क्षेत्रातील एका भारतीय स्त्रीने टाकलेले ते पहिले पाऊल होते. वाड्यात मोठ्या कुतूहलाने आपल्या बाईची नव्हे तर या देशातील पहिल्या ना ज्ञानईची सहा मुली हजर राहून वाट पाहत होत्या.

१. अन्नपूर्णा जोशी वय वर्षे ५
२. कु सुमित्रा मोकाशी वय वर्ष 4
३. कु दुर्गा देशमुख वय वर्ष ६
४. कु माधवी थत्ते वय वर्ष ६
५. कु सोनू पवार वय वर्ष ५
६. कु जनी करडिले वय वर्षे ५

ह्या मुली मराठा समाजातील व जनी करडिले ही धनगर समाजातील या त्या पहिल्या भारतीय स्त्रियांच्या शाळेतील सहा मुली तसेच उपेक्षित व दुर्लक्षित अतिशूद्र महार मांग, चांभार त्यांच्याकडे ज्योती चे लक्ष वेधले गेले. त्यांच्या जीवनातील परिवर्तनासाठी शिक्षण गरजेचे आहे. हे ओळखून त्यांनी १५ मे १८४८ रोजी अतिशूद्र पुण्यातील महार वाड्यात एक मुला मुलींसाठी शाळा सुरू केली .महार ,चांभार ,मांग मुलांच्यासाठी भारतातील भारतीय लोकांनी सुरू केलेली ही पहिली शाळा होय.

## पुणे सातारा प्राथमिक शाळेची सुरुवात-:

१८४८१-८५० पुणे सातारा या जिल्ह्यात प्राथमिक शाळेची सुरुवात झाली व काही शाळांमध्ये सावित्रीबाईंचे शिक्षक म्हणून काम केले .१५ जुलै १८४८ रोजी मुला मुलींसाठी शाळा सुरू करण्यात आल्या

**ज्योती सावित्रीच्या शिक्षणाच्या कार्यक्षेत्र पुण्या बाहेर नायगाव ,शिरवळ पर्यंत पसरले. तीन चार वर्षाच्या काळात मोठ्या ध्येयाने प्रेरित होऊन. ज्योती सावित्रीने अत्यंत कष्टाने व त्यागाने आपले जीवन शिक्षण कार्यात झोकून देऊन-:शाळा सुरू केल्या त्या खालील प्रमाणे 18 ,**

**१ (भिडे वाडा बुधवार पेठ १/१/१८४८**

**२ महार मांग शाळा महार वाडा पुणे(१५/५/१९४८**

**३ हडपसर (पुणे १९१८४८/**

**४ ओतूर (पुणे ५१२//१८४८**

**५ सासवड (पुणे २०१२//१८४८**

**६ पेठ (अल्हाटवाडा पुणे १७//१८४८**

**७ (नायगाव सातारा १५७//१८४९**

**८ (शिरवळ सातारा ८९//१८४९**

**९ तळेगाव ढमढेरे (पुणे १८७//१८४९**

**१० शिरूर (पुणे ८/९/१८४९**

**११ अंजीर वाडी माजगाव (मुंबई ३३//१८५०**

**१२ करंजे जिल्हा (सातारा ६/३/१८५०**

**१३ (भीमर जिल्हा सातारा १९९//१८५०**

**१४ मुंडवा (पुणे ११२//१८५०**

**१५(आप्पासाहेब चिपळूणकर वाडा पुणे ३७//१८५१**

**१६ (रास्ता पेठ पुणे १७९//१८५१**

**१७ शनिवार पेठ पुणे (१/१२/१८५१**

**१८ रस्ता (पुणे १५३//१८५२**

**1 मे 1849 पुणे येथील गंज पेठेतील उस्मान भाई शेख यांच्या वाड्यात प्रौढांच्या शाळेची सुरुवात केली ,या शाळेत सावित्रीबाई शिक्षिका म्हणून काम केले.**

## ज्योतिबा बरोबर सावित्री समाज परिवर्तनाची सुरुवात:-

**सन 1849 च्या आक्टोंबर मधील एका सायंकाळी ज्योतीने मोठ्या दु:खाने आपल्या धर्मपत्नी व आपल्या समूह आपल्या समाज परिवर्तनाच्या महान कार्यासाठी सहकारी जीवन साथी सावित्री हिच्यासह घराबाहेर पडण्याचा निर्णय दु:खद अंतकरणाने घेतला .शिक्षणासारख्या मानवतेच्या महान कार्यास क्रांतीची ज्योत पेटवणारी व त्या ज्योती ने समाजातील कनिष्ठ वर्गात व स्त्रियांना ज्ञानाचा प्रकाश दाखवणारी क्रांतीज्योती सावित्री ही विनम्र ,विनंतीशील ,सुसंस्कृत व आपल्या पतीच्या वर निष्ठा ठेवणारी होती तिनेही मोठ्या बुद्धीने पतीबरोबर घर सोडण्याचा निर्णय स्वखुशीने घेतला .शिक्षणाने माणसाला माणूस म्हणून घडवण्याचा समाजपरिवर्तनाच्या या महान यज्ञात आपल्या जीवनाच्या समिधा समर्पित करण्यासाठी सावित्रीने गोविंदरावा च्या पायावर डोके टेकवले घर सोडले .गंज पेठेतील शिक्षण कार्यास मदत करणारे पूर्व ग्रामीण व उदात्त विचारसरणीचे मुस्लिम समाजातील उस्मान शेख गृहस्थ राहत .त्यांच्या राहत्या घरी एक खोली देऊन त्यांना आसरा दिला व मदत केली. 3जुलै 1851 रोजी बंदिस्त जागेत अण्णासाहेब चिपळूणकर यांच्या**

वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली .शाळा लोकांच्या नजरेआड चालवली .शाळेच्या कार्यात सावित्री इतकी एकरूप झाली .की या शाळेला सावित्री ची शाळा म्हणू लागले 1851 .नॉर्मल स्कूलची स्थापना केली .या स्कूलची सावित्रीबाईने भारतातील मुस्लिम पहिली विद्यार्थिनी होती .व पहिल्या विद्यार्थिनीने व पहिल्या शिक्षिका का म्हणजे फातिमा शेख यांच्या मदतीने तरुण विवाहित स्त्रियांसाठी आणखी एक वर्ग गुप्तपणे सुरू केला होता .18 52मध्ये सावित्रीबाई ने आग्रहाने ज्योतिरावांना गंजपेठ सुरू केलेले पहिले सार्वजनिक वाचनालय सुरू केले .सावित्रीबाईंनी गंज पेठ एच 16 नोव्हेंबर 1852 रोजी विश्रामबाग वाड्यात मेजर कँडी यांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले यांचा जो शिक्षण कार्याचा गौरव कार्यक्रम झाला तो अभिमानास्पद होता .पूना कॉलेज चौकात दिनांक 12 फेब्रुवारी 1853 रोजी ज्योती सावित्री यांनी काढलेल्या मुलींच्या शाळेतील मुलींची परीक्षा मोठ्या जाहीर समारंभात झाली.

## काव्यसंग्रह-:

1854काव्यफुले सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला .बारा कवितांचा सावित्रीबाईंनी मोडी लिपीत वाचन केलेले उपलब्ध आहेत .बावनकशी सुबोध रत्नाकर काव्य आहे .सावित्रीबाईंनी ज्योतिबा 10 ऑक्टोंबर 1856 मातोश्री सावित्रीबाई गाणे व भाषणे छोटे पुस्तक 1892 प्रसिद्ध झाले .ज्योतिबा ची भाषणे 25 डिसेंबर 1856 चार भाषणे एका वहीत रेखाटले श्री महिमा स्तोत्र,

## सावित्री संग्रहालयातील उपलब्ध साहित्य-:

ग्रहलाघव, भूगोल पत्रक ,शाला पत्रक ,सिंहासन बत्तीशी ,गद्य रत्नमाला ,इसापनीती चरित्र , सात्रेतिसाचे , म्हानी विषयी चार शब्द ,शुभमबहानतरी ,हिंदुस्थानचा इतिहास ,अर्थ सांगरुद्र प्रारंभ ,नीतिशतक

## विधवा पुनर्विवाहला व बाल हत्या ला प्रतिबंधक गृहाची स्थापना -:

1862मध्ये विधवा पुनर्विवाहाला चालना देणाऱ्या सभेची स्थापना केली 1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची जोतिरावांनी सावित्रीबाई च्या साहयाने स्थापना केली .बाळंत होण्याचा आनंद तिला उपभोगता आला नाही .परंतु समाजाची तील विधवा मातांचे सुदैवाने शेकडो विधवा स्त्रियांची बाळंतपणे करण्याचे भाग्य सावित्रीबाईंना मिळाले .मातेच्या ममतेने त्यांनी माहेरवाशिणी मुली या नात्याने त्यांची बाळंतपणे मोठ्या ममतेने व आनंदाने केली .मानवजातीच्या इतिहासात या महान कार्याला तोड नाही .ज्योतिराव व सावित्री मूलबाळ नसल्याची खंत व्यक्त करायचे ज्योती रामाने दुसरे लग्न करावे असे त्यांना मनापासून वाटले .परंतु उघडपणे सांगणे त्यांना शक्य झाले नाही .व असे धाडस ही त्यांनी केले नाही .परंतु सावित्रीबाईंना लोकांकडून निपुत्रिक व वांझोटी म्हणून घ्यावे लागेल .गोविंदराव याच्या मृत्यूनंतर दोघं वडलांच्या वाड्यात राहावयास आले .पुण्यातील मुळा मुठा नदीच्या संगमापर्यंत मोकळ्या हवेत फिरावयास जात त्यांना देखणी व अडलेली गरोदर तरूण स्त्री दिसली .ती ब्राहमण घराण्यातील विधवा स्त्री होती .तिच्या घरातील कर्त्या पुरुषाने तिच्यावर बलात्कार केला होता .गरोदर असल्याचे घरातील लोकांना कळताच छळ करत होते .ती मरणासाठी निघाली ज्योती आणि तिला आवाज दिला व मरणावर पासून परावृत्त केले .त्या गरोदर स्त्री चे नाव' काशी'होते .तिची हाऊस केले .सावित्रीने तिचे बाळंतपण आईच्या मायेने केले .व तिला 1873 मध्ये मुलगा झाला .त्याचे नाव यशवंत ठेवले .व या यशवंतला दत्तक म्हणून सावित्रीबाई आणि ज्योतीबांनी दत्तक घेतले .दत्तक घेताना

घरातल्यांचा विरोध पत्करावा लागला होता .परंतु दोघांनी विरोधाला न जुमानता त्याचे स्वागत केले .व यशवंत ला सावित्रीने डॉक्टर केले.

1877 महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला त्यावेळेस दुष्काळातील महान कार्य केले .विक्तोरियाबाला आश्रमाची स्थापना केली 1877 .येथून सावित्रीबाई ने ज्योतिरावांना लिहिलेले पत्र दुष्काळाचे दुःखद वर्णन केले आहे 4 .फेब्रुवारी 1888 दत्तक पुत्र याचा ग्यानोबा ससाने यांची मुलीबरोबर मिश्र जाती पहिला विवाह झाला . 18 68मध्ये घरचा पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला11 . मे 1888 ज्योतिरावांना महात्मा या पदवीने गौरवण्यात आले .या जीवनी सावित्रीबाईंची भावना 1888 मध्ये ज्योतिरावांना अर्धांगवायूचा झटका आला 18 . नोव्हेंबर 1890 रोजी ज्योतिरावांचे महानिर्वाण झाले .व त्यांचे दुःखद निधनानंतर सन 1892मध्ये महाराज सयाजीराव यांनी सावित्रीबाई यशवंतराव यांना अर्थसहाय्य केले 1991 .मध्ये बावनकशी सुबोध रत्नाकर हा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला 1891 .मध्ये ओतूर येथे सावित्रीबाईंचे अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची पहिले अधिवेशन झाले .18 92मध्ये सासवड येथे सावित्रीबाई यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली 1890 .ते 1897 पर्यंत कार्य पुढे चालू ठेवले 10 .मार्च 1897 मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई यांचे निधन झाले .क्रांतीज्योती सावित्री निधन 1897 मध्ये महाराष्ट्रात प्लेग ची सात सुरू झाली .अशाच एका अनाथ मुलांना प्लेग रोगाची बाधा झाली .व त्याला सावित्रीबाईने कवटाळणे व पाठीवर घेतले पाठीवर घेऊन असताना संसर्गामुळे सावित्रीबाईंना प्लेग रोगाची बाधा झाली .आपल्या मुलास हॉस्पिटलमध्ये पोहोचवले औषध उपचार केला .त्याचा जीव वाचला ,परंतु मानवतेचे महान कार्य करीत असताना मृत्यूच्या जबड्यात सापडलेल्या दीनदुबळ्या अनाथ बालकांची सेवा करीत असताना त्यांना जीवन दान देण्याचे महान कार्य करीत असतानाच ही क्रांतीची ज्योत कायमची मावली गेली .या क्रांतीज्योती ने माणुसकीचा व मानव सेवेचे नंदादीप आपल्या त्यागाने व महान कार्याने कायमच तेवत ठेवला .अशा मानव सेवेचे व मानव धर्माचे पालन करीत असताना सावित्रीबाई चे निधन 10 मार्च 1897 मध्ये झाले.

## निष्कर्ष-:

सावित्रीबाईंच्या अलोकिक कार क्रांती कार्याचं गौरव करताना थोर व्यासंगी महात्मा फुले यांचे आधुनिक काळातील चित्रकार धनंजय कीर म्हणतात' ,एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेले सावित्रीबाई सारख्या अन्य आदर्श उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल .पंडिता रमाबाईंचे पांडित्य भरारी त्यांच्या अंगी नसेल .परंतु मंगल धडाडी निर्णय आज मानवता आणि भारतीय रमाबाई त्यांची बादलात बरोबरी करू शकल्या नाहीत .पुरोगामी चळवळीतील अनेक विचारवंतांनी सावित्रीबाईंच्या मानवतेच्या महान क्रांतिकार्याची गौरव करताना आपल्या भावना वेळोवेळी व्यक्त करत सावित्रीबाई यांचे संपूर्ण जीवन क्रांतिकारक असून त्याच्या भारतीय स्त्रियांच्या उत्थानासाठी केलेल्या सहृदय कार्याची तुलना करता एकही उदाहरण एकोणिसाव्या शतकात सापडत नाही .त्या खऱ्या अर्थाने युगप्रवर्तक ,आदिशक्ती असून सार्वजनिक कार्यासाठी घराबाहेर पडलेली .भारतीय पहिली स्त्री तसेच स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली एकोणिसाव्या शतकातील एकमेव स्त्री आहे .त्या भारतीय स्त्रीमुक्तीच्या खऱ्या अर्थाने आद्यप्रवर्तक आहेत .

## संदर्भ ग्रंथ-:

1. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय - डॉ. मा. गी. माळी

2. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले- ऍड राम कांडगे
3. क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले- मा. गो. माळी
4. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ- संपादक हरी नरके
5. सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड 1- s श्रीराम गुंदेकर